पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने पन्हाळा-पावनखिंड शिवपावन प्रेरणा मोहीम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विश्वास शिक्षण प्रसारक मंडळ, चिखली संचलित देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् व सायन्स कॉलेज चिखली (ता. शिराळा) यांच्या संयुक्त विद्यमाने पन्हाळा-पावनखिंड शिवपावन प्रेरणा मोहिमेचे २८ ते ३० डिसेंबर या कालावधीत आयोजन केले आहे.

मोहिमेचे उद्घाटन दि. २८ रोजी सायंकाळी ५ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अमरसिंह नाईक, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, पी. आर. भोसले, एन.आर. भोसले यांच्या उपस्थितीत संजीवन नॉलेज सिटी पन्हाळा येथे होणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये यांनी दिली.

मोहिमेत दि. २९ रोजी सकाळी पन्हाळा येथील शिवा काशीद पुतळा येथून मोहिमेस सुरुवात होईल. तेथून बाजीप्रभू देशपांडे पुतळा येथून मसाई पठार मार्गे कुंभारवाडी, खोतवाडी मार्गे करपेवाडी येथे मुक्काम होईल. करपेवाडी येथे शाहीर रंगराव पाटील यांचे पोवाडा गायन कार्यक्रम होईल. ३० रोजी मोहीम पांढरपाणीकडे मार्गक्रमण करेल. पांढरपाणी येथे जेवणानंतर पावनखिंडकडे जाताना शिवाजी महाराज यांची पालखी निघेल. पावनखिंड येथे सह्याद्री प्रतिष्ठान युद्ध कला सादरीकरण होईल.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील व प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. मनोज लेखक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2022
लोकमत

# विद्यापीठात पंजाबराव देशमुख यांना अभिवादन

कोल्हापूर : देशाचे माजी कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती शिवाजी विद्यापीठात मंगळवारी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते डॉ. देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2022

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. मनोज लेखक आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2022
तरुण भारत

# विद्यापीठात ऑनलाईन रिसीट पोर्टलचा वापर करा

- प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांचे आवाहन

**कोल्हापूर :** विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक अधिकारी, प्रशासकीय सेवक, सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था, सर्व अधिविभागांतील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन रिसिट पोर्टलचा वापर करावा. अधिकार मंडळांच्या ठरावानुसार शिवाजी विद्यापीठ परिसरामधील सर्व अधिविभागांद्वारे विद्यापीठाच्या जमास्वीकृती विभागात रोखीने, धनादेशाद्वारे तसेच बँक जमा पावतीद्वारे केल्या जाणाऱ्या पावत्या शनिवार ३१ डिसेंबर २०२२ पासून बंद करण्यात येत आहेत.

सर्व संबंधितांनी Online Receipt Portal चा वापर करून सर्व पावत्या ऑनलाईन करावयाच्या आहेत. सदर सुविधा विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Quick Links ceO³es Online Receipt Portal वर उपलब्ध करुन देण्यात आली आहे, असे आवाहन प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी परिपत्रकाद्वारे केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2022
पुढारी

# विद्यापीठात ३१ पासून ऑनलाईन रिसीट पोर्टलचा वापर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ३१ डिसेंबरपासून ऑनलाईन रिसीट पोर्टलचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. विद्यापीठाच्या जमास्वीकृती विभागात रोखीने, धनादेशाद्वारे तसेच बँक जमा पावतीद्वारे केल्या जाणाऱ्या पावत्या ३१ डिसेंबर पासून बंद करण्यात येत आहेत. दि. ३१ जानेवारी २०२३ पासून महाविद्यालये व इतर यांच्याकरिता सुविधा बंद करण्यात येणार आहे. सर्व संबंधितांनी ऑनलाईन रिसीट पोर्टलचा वापर करून सर्व पावत्या ऑनलाईन करावयाच्या आहेत. विद्यापीठाच्या www. unishivaji. . ac. in या संकेतस्थळावर Quick Links मध्ये उपलब्ध करून दिल्याचे प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2022
पुढारी

# विद्यापीठात आज पत्रकार जतीन देसाई यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे ज्येष्ठ पत्रकार, लेखक जतीन देसाई, मुंबई यांचे 'आशिया खंडातील आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयावर बुधवार, दि. २८ रोजी अर्थशास्त्र विभागातील सेमिनार हॉलमध्ये सकाळी ११ वाजता व्याख्यान आयोजित केले आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 DEC 2022
लोकमत

# जतिन देसाई यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे ज्येष्ठ पत्रकार, लेखक जतिन देसाई यांचे आज, बुधवारी, सकाळी अकरा वाजता अर्थशास्त्र विभागातील सेमिनार हॉलमध्ये व्याख्यान होणार आहे. 'आशिया खंडातील आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयावर ते विचार मांडणार आहेत. देसाई हे भारत- पाकिस्तान संबंधाचे अभ्यासक आहेत. दक्षिण आशियायी राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. ते 'इंडिया- पाकिस्तान पीपल्स फोरम फॉर पीस अँण्ड डेमोक्रेसी' या संस्थेचे महासचिव आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 DEC 2022
लोकमत

# न्यू कॉलेजच्या चार विद्यार्थिनी हँडबॉल संघात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जयपूर (राजस्थान) येथे पश्चिम विभागीय हँडबॉल स्पर्धा होणार आहेत. त्यात सहभागी झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघात न्यू कॉलेजच्या चार विद्यार्थिनींची निवड झाली आहे.

ऋतुजा कळंत्रे, एकता पाटील, साक्षी नाळे, पूजा जाधव यांचा समावेश आहे. त्यांना प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख, क्रीडा विभागप्रमुख प्रा. अमर सासणे, संदीप पाटील, राहुल तिवले, प्रदीप साळोखे यांचे मार्गदर्शन लाभले.


ऋतुजा कळंत्रे


एकता पाटील


साक्षी नाळे


पूजा जाधव

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2022

# शिवाजी विद्यापीठाला रनरअप चॅम्पियनशिप

कोल्हापूर,ता.२६ (प्रतिनिधी)-

..............................

जम्मू विद्यापीठ जम्मू येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फेंसिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाला रनरअप चॅम्पियनशिप मिळाली.

पुरुष संघातील खेळाडू धनंजय जाधव, आदित्य अनगळ, गिरीश जकाते, प्रथम शिंदे, विपुल येडेकर ,अथर्व करणाळे, श्रेयस तांबवेकर,प्रणव रावळ , साहिल गुजर, ओम जवनजाळ, श्रीधर पवार हे होते .त्याचबरोबर तसेच महिला संघाने फाईल क्रीडा प्रकारात कास्य पदक पटकावले महिला संघातील विजेते खेळाडू ज्योती सुतार, अनन्या जोशी, तनवी कुराडे, अमृता तराळ हे होते. डॉ राहुल मगदूम,प्रफुल धुमाळ यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 8 DEC 2022

पुण्यनगरी

## विज्ञानाच्या विश्वात



डॉ. व्ही.एन. शिंदे

# अल्पविराम!

विज्ञान हा महत्त्वाचा विषय. मानवाने त्याकडे केवळ आपले जीवन सुखकर करण्याचे साधन म्हणून पाहिले. विज्ञानाच्या क्षेत्रात कार्य करणारे, संशोधक ज्ञानाचा शोध घेत होते. सुरुवातीला निसर्गातील घटना आणि बदलांमागचा कार्यकारणभाव शोधत विज्ञानाला सुरुवात झाली. निसर्गविज्ञान म्हणून अभ्यास केला जाऊ लागला. जसजशी विषयाची व्याप्ती वाढत गेली, तशी विविध ज्ञानशाखांची स्वतंत्र विषय म्हणून निर्मिती करण्यात आली. भौतिक, रसायन आणि जीवशास्त्र तयार झाले. त्यामध्ये घडणाऱ्या बदलांचा अभ्यास करताना गणित अनिवार्य झाले. ग्रहताऱ्यांच्या अभ्यासात मोठ्या संख्यांचा वापर करताना, सूक्ष्म गणन आणि अतिसूक्ष्म गणनाचाही विकास झाला. गणिताने अवघे विज्ञान विश्व व्यापले. विज्ञानाची भाषा गणिती बनली. काही संशोधक गणिती उकल करण्यात मग्न झाले. त्यांना सैद्धांतिक संशोधक मानले जाऊ लागले. गॅलिलिओपासून अनेक संशोधकांनी जे वाटते ते प्रयोगाच्या कसोटीवर पडताळून पाहण्यास सुरुवात केली. त्यांना प्रायोगिक संशोधक म्हणून ओळखले जाऊ लागले. अनेकांनी विज्ञान संशोधनासाठी आपले आयुष्य खर्ची घातले आणि आजचे युग अवतरले.

विज्ञान आणि त्या मागोमाग तंत्रज्ञान विकसित होत होते. त्यामागील सत्य केवळ अभ्यासकांना माहीत असते. विज्ञानाची गणिती भाषा सर्वसामान्यांना समजणारी नसते. अनेकदा त्या विषयातील विद्यार्थ्यांनाही समजत नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर जेम्स क्लर्क मॅक्सवेल यांचे देता येईल. त्यांनी स्वतः काहीच शोधले नाही; मात्र अँपिअर, फॅराडे आणि गॉस यांच्या सूत्रांतून चार नवी सूत्रे बनवली. त्यांना वेगळा अर्थ दिला. या सूत्रांवर आजच्या संदेशवहन यंत्रणा कार्यरत आहेत. तथापि, अगदी एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनाही ही सूत्रे समजत नाहीत. बहुतांश विद्यार्थी ती पाठ करतात. मात्र, यातून निर्माण झालेले तंत्रज्ञान- रेडिओ, दूरदर्शनपासून भ्रमणध्वनीपर्यंत सर्वजण वापरतात. ते कसे चालते, हे विज्ञानाच्या अनेक अभ्यासकांना माहीत नसते. तंत्रज्ञानाचा वापर मात्र सर्वजण करतात. अगदी शाळेची पायरीही न चढलेली आजीबाई, अमेरिकेतील नातवांना व्हिडीओ कॉल करून छानपैकी गप्पा मारत बसलेली दिसते.

सर्वसामान्यांना वैज्ञानिक तथ्ये समजून घ्यायची नसतात असे नाही. मात्र, ती त्यांच्यापर्यंत सोप्या, समजेल अशा भाषेत पोहोचत नाहीत आणि आहे त्या भाषेत समजून घेण्याइतपत त्यांच्याकडे वेळ नसतो. ते तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ आपल्या भौतिक सुखांसाठी करतात. त्यातून अनेकदा वैज्ञानिक तथ्ये न समजल्याने निसर्गाची हानी मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे विज्ञानाची मूलभूत माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक बनते. पाश्चात्य राष्ट्रात अनेक वैज्ञानिक आपल्या शोधांची माहिती सर्वसामान्यांना समजेल, अशा भाषेत पत्रक काढून प्रसृत करतात. त्यामुळे कार्व्हरसारख्या संशोधकाचे कार्य दक्षिण अमेरिकेतील अशिक्षित, अल्पशिक्षित निग्रो शेतकऱ्यापर्यंत लगेच पोहोचत असे. तेथे शेती प्रगत बनली. भारतात मात्र अशी परंपरा, संस्कृती विकसित झालेली नाही. क्रीडा पत्रकारितेप्रमाणे, विज्ञान पत्रकारिता विकसित झाली नाही. त्यामुळे वर्तमानपत्रे, प्रसारमाध्यमांतून अशी माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची मोठी गरज भासते. या लेखमालेतून वैज्ञानिक माहिती, घटनांमागील वैज्ञानिक तथ्ये मांडण्याचा प्रयत्न सातत्याने केला. अनेक घटना घडल्यानंतर आलेली अस्वस्थता वैज्ञानिक माहितीसह मांडता आली. एलन मस्कसारखा भांडवलदार माणसाचे वर्तन नियंत्रित करू इच्छितो. हाशम अल-घायलीसारखा संशोधक कुटुंबव्यवस्था विस्कळीत करणारे संशोधन करत आहे. या घटना संवेदनशील मनाला अस्वस्थ करणाऱ्या. त्यावर व्यक्त होताना तणावमुक्त होत होतो. दिल्लीतील हवेची गुणवत्ता आणि इतर शहरांतील ढासळणारी हवेची गुणवत्ता हा कायम चिंतेचा विषय आहे. लोकांकडून पिकांचा अनावश्यक जाळला जाणारा भाग हवेची गुणवत्ता ढासळण्यास कारणीभूत ठरतो हे मांडता आले. यातून काही वाचकांच्या प्राप्त प्रतिक्रिया, 'लोकांना हे सांगायला हवे' असे सुचवणाऱ्या होत्या. 'अपघातामागचे विज्ञान' मांडताना न्यूटनचे नियम सोपे करून मांडता आले. अनेक वाचकांनी आपण ही चूक करत असल्याचे मान्य करून, पुन्हा असे वाहन चालवणार नसल्याचे मान्य केले. भारताची गगनयान मोहीम, चांद्रयान मोहीम अशा अनेक विषयांवर लिहिता आले. 'ई'कचऱ्यावरचा लेख वाचून प्रा. भोला यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पासाठी विषय निवडला. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष चर्चा केली. विदेशी झाडांची वादळात मोठ्या प्रमाणात हानी होते. ३० सप्टेंबरच्या वादळात देशी झाडांचे किमान आणि विदेशी झाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यातून देशी वाणांच्या झाडांची उपयुक्तता सांगता आली. जागतिक तापमानवाढ आपल्या उंबरठ्यावर येऊन पर्यावरण वाचवण्यास सांगत आहे, हेही मांडता आले. एअर बॅग्ज कशा कार्य करतात, याची माहिती लिहिता आली. नारळ दिन जागतिक पातळीवर साजरा होतो, त्याचे औचित्य साधत नारळाचे उपयोग वाचकांपर्यंत पोहोचवता आले. विदेशी तणांचे दुष्परिणाम आणि जंगली श्वापदांचे शहरात आगमन यातील सहसंबंध मांडता आला.

चांद्यापासून बांद्यापर्यंत महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक जिल्ह्यातील ज्येष्ठांपासून तरुणांपर्यंत सर्व स्तरातील वाचकांकडून प्रतिक्रिया मिळाल्या. या प्रतिक्रिया उमेद वाढवणाऱ्या होत्या. लिहिते राहण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या होत्या. छत्रपती शिवरायांचा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन लिहिल्यानंतर इतके फोन आले की, भ्रमणध्वनी काही काळ पुनर्प्रभारित करावा लागला. सुरेश ठाकरे, नगर जिल्ह्यातील वाचक रेशन दुकानदार. प्रत्येक लेख वाचून प्रतिक्रिया देत होते. मागील काही लेखांना त्यांचा प्रतिसाद न मिळाल्याने अस्वस्थ वाटले. त्यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र तो लागत नाही. हुरहूर वाटावी इतके प्रेम वाचकांनी केले, दिले. त्यासाठी सर्व वाचकांचा मनःपूर्वक ऋणी आहे. त्यांचे आभार न मानता ऋणातच राहणे योग्य वाटते; कारण तेच लिहिण्यासाठी प्रेरणा देत असते. विविध घटना, त्यामागील विज्ञान समजून घेण्यासाठी वाचक उत्सुक आहेत. त्यांची ही भूक भागवल्यास निश्चितच विज्ञाननिष्ठ विवेकी समाजाची निर्मिती होईल. या समग्र लेखनाचा खटाटोप त्यासाठीचाच तर आहे.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००